शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ताः शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १०४ वा | रविवार, दि. १७ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मोदी, शहा, फडणवीस व योगी हे काल्पनिक राजकीय भिती दाखवितात

**पुरुषोत्तम खेडेकर, चिखली**

बटेंगे तो कटेंगे व एक है तो सेफ है, असे द्वेषमूलक तसेच भितीयुक्त नारे देत भाजप व आर.एस.एस. चे नेते समाजात धर्म, जात, जमाती, पंथ, भाषा व प्रांत इत्यादी मधील सामाजिक सांस्कृतिक धार्मिक सौहार्दाचे व एकात्मतेचे वातावरण खराब करत असल्याचे लक्षात येते. त्यासाठी भाजपचे प्रमुख नेते नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस व योगी आदित्यनाथ आघाडीवर आहेत. तर राज्यातील काही भाजपचे व महायुतीचे नेते संभ्रमात पडले आहेत.

भाजप व आर.एस.एस. यासाठी भुतकाळातील भारतावरील इस्लामी आक्रमणांचे दाखले देऊन हिंदू विरुद्ध मुस्लिम धर्मीय जनतेच्या मनात आपसात द्वेष निर्माण करण्यासाठी झटत आहेत. कारण आहे विधानसभा निवडणुका. मुस्लिम आक्रमकांनी त्याकाळी हिंदू समाजावर अतोनात अत्याचार केले होते व हिंदू स्त्रियांवर बलात्कार केले होते. जाळपोळ करुन गावेच्या गावे उध्वस्त केली होती. हिंदूंचे जबरीने धर्मांतर केले होते. असे अनेक आरोप भाजप व आर.एस.एस. करत असतात. हे सर्वच आरोप अगदी खरे असल्याचे आपण मानू.

सुमारे पंधराशे वर्षापूर्वी इस्लाम स्थापन झाला व सातव्या शतकात तत्कालीन भारतातील सिंधू प्रांतात पहिले आक्रमण झाले. राज्यकर्ते ब्राह्मण वैदिक होते. ते पराजित झाले. स्वेच्छेने मुस्लिम झाले. नंतर पुढील सुमारे एक हजार वर्षात आलेल्या परकिय मुस्लिम आक्रमकांमध्ये प्रमुख सुलतान खिलजी मोगल मानले जातात. या सर्वच आक्रमक मुस्लिमांना भारतात स्थिर होऊन यशस्वीपणे राज्य कारभार चालविण्यासाठी सगळीकडेच ब्राह्मण समाजाने त्यांच्याकडे मंत्री, कारभारी, कारकून ते खोजे अशा पदांवर भरपूर पगार घेऊन नोकऱ्या केल्या. तर अनेक ब्राह्मणांनी स्वेच्छेने मुस्लिम धमार्चा स्वीकार केला. त्यांना अशरफी मुसलमान मानतात. तर हिंदू धमार्तील ब्राह्मणी वर्चस्व व जाती भेद विषमता याला कंटाळून शूद्र वंचित अस्पृश्य समजल्या गेलेल्या हिंदू बांधवांनी स्वेच्छेने मुस्लिम धमार्चा स्वीकार केला होता. ते अजलफी पसमंदा मानले जातात. ते आजही शूद्र वंचित पिडित आहेत. पाकिस्तान अशरफी तर बांगलादेश अशरफी मुस्लिम आहेत. स्वामी विवेकानंदांचे मते भारतातील हिंदूंचे धर्मांतर नगण्य अपवाद वगळता स्वेच्छेने झाले आहे. तसेच नंतर अफगाणी बलूची अरबी, इराणी, इराकी व तुर्की इत्यादी आक्रमक मुस्लिमांनीच कारभार केला. आजच्या भारतात यापैकी कोणीही परकिय नाहीत. सर्वच भारतीय मुस्लिम धर्मांतरित वैदिक सनातन ब्राह्मण व बहुजन हिंदू आहेत. ते सर्वच मूळचे हिंदू असून एकाच डीएनए चे असल्याचे आर.एस.एस. सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी मान्य केले आहे. अशरफी मुस्लिमांना स्वतंत्र भारतात मोठी पदे मिळाली आहेत. तसेच त्यांना ब्राह्मणांनी जावई केलेले आहे. त्यांच्या लग्नात मोठमोठे ब्राह्मण उपस्थित असतात. आदराचे स्थान दिले जाते. तर गोरगरीब मुस्लिम मुलगा व गोरगरीब हिंदू मुलगी लग्न करत असले तर लव्ह जिहाद मानले जाते. ते लग्न उधळून लावले जाते. जर मुस्लिम राजवटीत जबरदस्तीने धर्मांतर केले असते तर पंधराव्या शतकात शंभर टक्के भारताचे इस्लामीकरण झाले असते. तसे झाले नाही. हे स्वामी विवेकानंदांचे म्हणणे योग्य ठरते.



भारतीय इतिहासात पहिले आक्रमक घुसखोर आर्य वैदिक सनातन ब्राह्मण मानले जातात. यात जैन, बौद्ध, संगम, भक्ती, शाक्त व अवैदिक धर्म संपवले आहेत. जगातील आर्य आक्रमक एकमेव असे होते की ज्यांनी स्थानिक प्राचिन भारतातील मूळ निवासी धर्म संपवले आहेत. तसे मुसलमान आक्रमकांनी केलेले नाही. एवढेच नाही तर ब्राह्मण वैदिक सनातन धमार्चे आहेत. तर बहुजन समाज अवैदिक हिंदू धमार्चे आहेत. ही सर्व विभागणी मुसलमानांनी केलेलीं नाही. वैदिक सनातन धर्म सर्वच हिंदू एक नसून चार वर्णात व सहा हजार पेक्षा जास्त जाती उपजाती मध्ये विभागलेला असल्याचे मानतो. म्हणजेच आम्ही सर्व हिंदू एक नाहीत. सेफ नाहीत. हजारो वर्षापासून वेगवेगळ्या जातींमध्ये वाटलेले आहोत. म्हणजेच बटे है. आता ब्राह्मण व शूद्र दोनच वर्ण आहेत. याच कारणाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक करण्यास विरोध केला होता. आज तेच छत्रपती शिवाजी महाराज तुम्हाला सत्ता मिळवून देण्यासाठी एक साधन झाले आहे. तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल प्रामाणिकपणे आदर असता तर तुम्ही कोकणात राजकोट येथील शिवशिल्पात घोळ केला नसता. तीन चार टक्के ब्राह्मण व ९६-९७% बहुजन हिंदू. यातील साठ टक्क्यांहून अधिक हिंदूंना शिक्षण नाही, नोकरी नाही, शेती नाही, इज्जत नाही, मंदिर प्रवेश नाही, बरोबरीचे स्थान नाही, बरेच हक्क, अधिकार व स्वातंत्र्य नाहीत. जर आम्ही सर्वच हिंदू एक आहोत तर आमच्यात एवढे भेदभाव का आहेत? नरेंद्र मोदी, अमित शहा, योगी आदित्यनाथ व देवेंद्र फडणवीस बहुजन हिंदूंना बरोबरीचे स्थान देणार आहेत काय? आमचे धार्मिक शैक्षणिक आध्यात्मिक आर्थिक अधिकार आमच्याच सर्वोच्च मानलेल्या ब्राह्मण हिंदूंनी नाकारलेले आहेत. मुसलमानांनी नाहीत. आम्ही जेव्हा आमच्यावर होत असलेल्या ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान देतो किंवा ब्राह्मणवादी व्यवस्था नाकारतो तेव्हा त्याकडे ब्राह्मण द्वेष म्हणून पाहिले जाते. हे चूक आहे. मुस्लिम राजवटीत हिंदू प्रजेवर झालेल्या अत्याचारांसाठी ब्राह्मण मंत्री जास्त जबाबदार ठरतात. स्वातंत्र्यापूर्वी निजामशाही जूनागड मुस्लिम संस्थानात हिंदू व अजलफी मुस्लिम जनता एकमेकांना आधार देत होती. आजही तेच चित्र आहे. सन २०२० मध्ये आम्ही प्रस्ताव दिला होता की तुम्हाला मुस्लिम धमार्तील लोकांबद्दल जर एवढा अविश्वास व द्वेष वाटत असेल तसेच त्यांच्यामुळेच भाजपला राजकीय सत्ता मिळत नसेल, तर भारतीय संविधान दुरुस्ती करून मुस्लिम जनतेला असलेले मतदान अधिकार पूर्णपणे काढून घ्यावेत. परंतू त्या बदल्यात त्यांना अन्य सर्वच अधिकार मिळाले पाहिजेत. बारमाही हिंदू, मुस्लिम, खिश्चन, शिख व बौद्ध भांडणे लावण्याचा धंदा बंद करून आमच्यावर उपकार करावेत. भारतात सुमारे ऐंशी टक्के जास्त हिंदू तर सोळा टक्के मुसलमान आहेत. कशाला भिती दाखवता. आम्हाला जन्मभर अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नोकरी व आरोग्य या सुविधा सुरक्षा, बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य, समन्याय, समानता, एकात्मता, शांतता व सुव्यवस्था इत्यादी मानवी विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करुन देणे. या परिस्थितीत तुम्ही नेहमी सत्ताधारी रहावे.

शेवटी नम्र निवेदन आहे की, नरेंद्र मोदी, अमित शहा, योगी आदित्यनाथ व देवेंद्र फडणवीस सर्वप्रथम आम्हाला सर्वच हिंदूंना एक करण्यासाठी हिंदू धर्मात समता, बंधुता, स्थापित करुन सर्वच जाती नष्ट करुन सर्वांनाच सारखेच धर्माधिकार व हक्क सुध्दा मिळवून देणे. सर्वच एक. कोणीही हलका नाही. भारी नाही. असा सर्वच एक जातीय, एकजीव, एक धर्मीय, एक देशीय, एकसंध हिंदू समाज सर्वप्रथम निर्माण करणे आवश्यक आहे. तसे झाले तर हा देश आपोआपच हिंदुस्थान होईल. हिंदू राष्ट्र होईल. सदिच्छा... !

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# माझ्यावर टीका करण्यापेक्षा तुम्ही वीस वर्ष काय केला जनतेच्या समोर येऊन सांगा

## महेश कोठे यांची देशमुखांवर टीका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे हे पदयात्रा कॉर्नर बैठका च्या माध्यमातून जनतेशी संवाद साधत असून मोठया प्रमाणात जनतेचा पाठींबा महेश कोठे यांना मिळत आहे, शनिवारी लक्ष्मी मंडई येथील दक्षिणमुखी मारुती मंदिरात महेश कोठे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली, यावेळी महेश कोठे यांचा सत्कार करण्यात आला

यावेळी महेश कोठे यांनी बोलताना विजयकुमार देशमुख यांनी उठसूट माझ्यावर टीका करण्यापेक्षा आपल्या मतदार संघात काय केलं हे जनतेसमोर येऊन सांगावं, शहर उत्तर मधील युवकांसाठी तर सोडा तुमच्या कार्यकर्त्यांसाठी काय केलं हे सांगा, लोक आता वीस वर्षाची भाकरी करपली आहे, त्यामुळे लोकांना आता नवीन भाकरी पाहिजे, त्यामुळे लोकांनी आता नवीन युवकाला संधी देण्याचे ठरवले असल्याचे कोठे म्हणाले.



# सोलापूर दक्षिण मतदारसंघामधून धर्मराज काडादींना निवडून आणणारच - धनगर योध्दा सिद्राम चोपडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २५१, सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून धर्मराज काडादींनाच निवडून आणण्याचा निर्धार भंडारकवठ्याचे धनगर योध्दा सिद्राम चोपडे यांनी व्यक्त केला आहे.

सिद्राम चोपडे यांनी २५१, सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवारी दाखल केली होती. तसेच महासिध्द गायकवाड, महावीर बंडगर आणि परशुराम डोंबाळे यांनी देखील अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु सिद्राम चोपडे यांनी सर्वांना एकत्रित करुन वरील तिघांना विनंती करुन उमेदवारी मागे घेऊन सर्व शक्ती धर्मराज काडादी यांच्या मागे उभी करण्याचा निर्णय सिद्राम चोपडे यांनी घेतला व त्यात ते यशस्वी झाले.

धर्मराज काडादी हे एक सुसंस्कृत, प्रामाणिक व निष्कलंक उमेदवार असल्याने त्यांनाच येत्या विधानसभेत पाठविण्याचा निर्णय आम्ही सर्वांनी घेतला आहे.

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघात धनगर समाजाची सुमारे ९७००० इतकी निर्णायक मते असल्याने धरगरयोध्दे सिद्राम चोपडे यांनी गेल्या ६ महिन्यापासून मतदासंघात गावभेट दौरा केला असून सर्व मतदासंघ पिंजुन काढला आहे.





तरी आता सिद्राम चोपडे हे सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातील तमाम धनगर समाज बांधवांच्या घरोघरी प्रत्यक्ष वाड्या वस्त्यावर जाऊन धर्मराज काडादी यांच्या कॉंप्युटर चिन्हावर मतदान करुन त्यांनाच भरघोस मतांनी विजयी करा असे हात जोडून व विनंती करुन सर्व धनगर समाज बांधवांना सांगत आहेत तसेच धरगर समाजाची जास्तीत जास्त निर्णायक मते धर्मराज काडादी यांनाच मिळतील यासाठी सिद्राम चोपडे हे अहोरात्र प्रयत्न करीत आहेत.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे व सोलापूरच्या विद्यमान खासदार प्रणिती शिंदे यांचे सिद्राम चोपडे हे कट्टर समर्थक असून त्यांचा सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारंघात उत्तम जनसंपर्क आहे. धर्मराज काडादीयांना आमदार करुनच सिद्राम चोपडे हे त्यांना कोल्हापूर जिल्ह्यातील आदमापूर येथे श्री सदगुरु बाळुमामा यांच्या दर्शनासाठी घेऊन जाणार आहेत असे त्यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

याप्रसंगी महासिश्द गायकवाड, महावीर बंडगर, परशुराम डोंबाळे, रावसाहेब म्हनमाने, रामदास शिनीवडियार, संजीवकुमार कोळी, आमसिध्द कमळे, मलकारी काळे, राहुल गोवित्रीकर, मोहन जाधव, देवेंद्र म्हेत्रे, गणपती रोकडे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते हजर होते.

# सातपुते यांचे पुनश्च आमदार होण्याचे स्वप्न राम भरोसे?

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस विधानसभा मतदारसंघात सध्या दुर्मिळ दृश्य जनतेला पहावयास मिळत असून, आमदार राम सातपुते यांचे पुनश्च आमदार होण्याचे स्वप्न राम भरोसे असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गेले अनेक वर्षापासून, गुडघ्याला बाशिंग बांधून, आमदारकीसाठी संघर्ष करणाऱ्या उत्तम कार्यकर्त्यांनाही राजकारणाची दिशा बदलावी लागली आहे. तर मोहिते पाटील यांच्या कृपाशीवार्दाने गेली, पाच वर्ष आमदारकीचा उपभोग घेणारे, राम सातपुते यांनी मोहिते पाटील यांची साथ सोडुन, स्वताःच्या पायावर धोंडा मारून घेतला असून, यांचे पुनश्च आमदारकीचे स्वप्न भाजपाच्या जीवावर साकार होईल का? असाही प्रश्न माळशिरस तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

माळशिरस विधानसभा मतदारसंघ हा राखीव मतदार संघ असून, राम भरोसे उत्तम क्रांतीच्या वाटेवर असणाऱ्या डझनभर उमेदवार, मोठ्या उमदेने माळशिरस विधानसभा मतदारसंघाच्या रणांगणात उतरले आहेत. यामध्येही चंदन आणि बाबळीच्या वृक्षाचा फरक समजत नाही असे लोकही, निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत.

भाजपने मागील पंचवार्षिकला मोहिते पाटील यांच्या जीवावर, माळशिरस तालुक्यातील जनतेच्या माती मारलेले, राम सातपुते सारखे आपत्कालीन संकट आमदार झाले. परंतु मतदार चुकला आणि विकासाला मुकला अशी गत निर्माण झाली होती. अशातच आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची पुण्याई कामी आली. आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी या तालुक्यात विकास कामांची किमया करून दाखवत, निष्क्रिय आमदार राम सातपुते यांचे पाप धुतले, म्हणून या पापाचे फळ सोलापुरात लोकसभेवेळी राम सातपुते यांना फेडावे लागले. म्हणूनच इथली जनता विचारत आहे, हे राम... आपण पाच वर्षात, काय केले काम!



लोकशाही ही सर्वश्रेष्ठ प्रणाली असते. तिच्या माध्यमातून जनतेच्या आयुष्यात विकासकामांचां प्रकाश पेरायचा असतो. विकासाचे ध्येय गाठण्याची क्षमता असावी लागते, कार्याची निती स्पष्ट असावी लागते तर जनतेबद्दल तळमळ असावी लागते. सोबत इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासही असावा लागतो.

राजकारण करताना, व्यक्तीगत स्वाथार्ला मूठ माती देणे अपेक्षित असते परंतु तसे दिसत नाही. असे राजकीय जाणकार बोलून दाखवत असून, आमदार राम सातपुते यांचे राजकीय भविष्य धोक्याचे संकेत देत आहे?

# सत्ता मिळवण्यासाठी धनगरांचा वापर करून घेणाऱ्या भाजपच्या पेकाटात काठी हाणायची वेळ आली आहे- भूषणसिंह होळकर

**नंदेश्वर (कटूसत्य वृत्त):-** मागील दहा वर्षात धनगरांनी आपली घोंगडी अंथरून भाजपाला सत्तेच्या सिंहासनावर बसविले. सत्ता आल्यानंतर मंत्रिमंडळाच्या पहिले कॅबिनेटमध्ये धनगरांना एसटी आरक्षण देतो म्हणणाऱ्या भाजपने धनगरांना फसविले. इतकेच नाही तर हजार कोटींचे तरतूद केल्याचे गाजर दाखवित एक रुपया सुद्धा दिला नाही. अशाप्रकारे सत्ता मिळवण्यासाठी धनगरांचा वापर करून घेणाऱ्या भाजपच्या पेकाटात काठी हाणायची वेळ आली आहे असे म्हणत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तेरावे वंशजराजे भूषणसिंह होळकर यांनी भाजपवर हल्लाबोल चढविला. नंदेश्वर (ता.मंगळवेढा) येथे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.



यावेळी उमेदवार अनिल सावंत, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, राष्ट्रवादीचे नेते राहुल शहा, चंद्रशेखर (पान 2 वर..)

मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील मातब्बर नेते माजी उपसभापती दादासाहेब गरंडे यांनी अनिल सावंत यांना पाठिंबा दिला. तसेच रड्डे गावचे माजी सरपंच सुरेश कांबळे, भाजपा ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष धनाजी गडदे, नंदेश्वर गावचे विद्यमान उपसरपंच आनंदा पाटील, अंकुश कांबळे यांनीही अनिल सावंत यांना पाठिंबा दिला. यामुळे अनिल सावंत यांना तालुक्याच्या दक्षिण भागात चांगला फायदा होणार असल्याची चर्चा होत आहे.

# यशवंताला पुन्हा एकदा आमदार करा; मतदारसंघाला ४ हजार कोटींचा निधी देतो

## आ. यशवंत माने यांच्या प्रचार सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसमुदायाला ग्वाही





**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** "जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आकाशात तळपत आहेत, तो पर्यंत संविधानाला कोणीही धक्का लावू शकत नाही. आम्ही शिव, फुले , शाहू आंबेडकरांच्या विचारांचे पाईक आहोत. दोन वर्षात साडेतीन हजार कोटी रूपयांचा निधी मोहोळ मतदार संघासाठी दिला आहे येत्या काळात तुम्ही महायुतीच्या उमेदवार अर्थात यशवंताला निवडून द्या मी मोहोळ मतदारसंघात चार हजार कोटींचा निधी पुढील पाच वर्षात विकास कामासाठी देतो. मतदारसंघातील जे काही सिंचनाचे प्रश्न असतील, रस्त्याचे प्रश्न असतील सर्व प्रश्न मार्गी लावू, त्यासाठी कसलाही निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील प्रचार सभेत उपस्थित जनसमुदायाला दिली.

मोहोळ मतदार संघाचे उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी विचारपीठावर मोहोळ चे माजी आमदार राजन पाटील, पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रदीप गारटकर, लोकनेते शुगरचे चेअरमन विक्रांत पाटील, माजी पं.स. सदस्य अजिंक्यराणा पाटील, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे, भिमाचे माझी व्हाईस चेअरमन कल्याणराव पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी, बाजार समितीचे सभापती असलम चौधरी, भाजपा तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.

**बटेंगे तो कटेंगे चा नारा चालणार नाही**

एका राज्याचे मुख्यमंत्री येऊन त्यांनी महाराष्ट्रामध्ये बटेंगे तो कटेंगे चा नारा दिला. मी त्यांना सांगितलं हा शिव शाहू फुले शिवाजींचा महाराष्ट्र आहे. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. इथं ही घोषणा चालणार नाही. इथे सर्व जाती धर्म गुण्या गोविंदाने राहतात. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. आणि रयत म्हणजे आपण सगळे आलो असे सांगत माहितीच्या नेत्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घरचा आहेर दिला.

यावेळी पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, लोकसभेला महायुतीचे उमेदवार का पडले याविषयी मी अभ्यास केला असता माझ्या असे लक्षात आले की निवडणुकीपूर्वी केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदी केली होती. त्याचा सर्वाधिक फटका महाराष्ट्रातील लोकसभेला बसला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सोयाबीन, कांदा, ऊस, दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात करतो. मात्र केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे लोकसभेला याचा मोठा फटका बसला. त्याचबरोबर यांना घटना बदलण्यासाठी ४०० पार पाहिजेत त्यामुळे या गैरसमजातून लोकसभेला मोठा फटका बसला.

मोहोळ तालुक्यातील आष्टी व शिरापूर योजनेतून अनगरसह नऊ गावात व माढा तालुक्यातील दोन गावातील बारा हजार ९०० हेक्टर क्षेत्र म्हणजेच ३२ हजार ५०० एकर (पान 2 वर..)

## संपादकीय

# पैशाचा जादुई रंग!

पैशाचा रंग हा जादुई आहे! कर भरला तर तो पैसा पांढरा! म्हणजेच काळा पैसा असलाही आणि त्याच्यावर कर भरला तर तो पांढरा होतो! म्हणजेच एक नंबरचा होतो, नाही भरला तर दोन नंबरचा. आहे की नाही जादू!

'भांडवल म्हणजे मृतश्रम, पण ते जिवंत माणसाचे श्रम पिऊन जगू शकते' ही भावनिक अर्थात सशक्त, सखोल आणि अर्थविषयक तात्विक भाषा कार्ल मार्क्स यांची आहे. अर्थात, काळे स्वरूपातील भांडवल याविषयी जगात सर्वात मोठी समस्या निर्माण होत आहे. काळे भांडवल मानवाचे जास्तीत जास्त शोषण करते, भांडवल अर्थात पैसा! अर्थव्यवस्थेत दोन प्रकारच्या पैशाचा वावर असतो, काळा पैसा आणि पांढरा पैसा. अविकसित देशांमध्ये काळ्या पैशाचा वापर जास्त प्रमाणात होतो. भारतात तीच परिस्थिती सध्या होऊन बसली आहे. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये देशात काळ्या पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, मग यातून सत्ता हाशील झाल्यानंतर परत काळ्या पैशाची निर्मिती होते. सत्ताधारी आपल्या सत्तेचा वापर करून काळ्या पैशांद्वारे जनतेवर नियंत्रण व अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याबरोबरच स्वतःची खुर्ची अर्थात सत्ता टिकवण्याचाही आणि लोकप्रतिनिधी त्याचबरोबर पक्ष फोडून सत्तांतर करण्यासाठी काळ्या पैशामुळेच हातभार लागतो. हे अर्थचक्र चालूच असते. जगभरातील कोणत्याही नियोजनाची योजना फिकी पडावी अशी सध्याची भारतातील निवडणूक पद्धती आहे. कारण की यामध्ये काळ्या पैशाचा वापर सर्रास होतो.

काळ्या पैशाचा वापर सर्वात जास्त निवडणुकीच्या कालावधीमध्ये केला जातो. काही वस्तू वाटप स्वरूपात तर काही रोख स्वरूपात. हे वाटप एवढ्या कौशल्याने केले जाते की अनेक नियम व अडथळे यामधून त्यांची सुटका होते. अनेक मतदारांच्या हातापर्यंत ही 'वाटप' जाताना कोणाच्या कानाला खबर लागत नाही. ज्येष्ठ विचारवंत पिटी बर्मन म्हणतात, पैसा काही बाबतीत अग्नीसारखा असतो! तो एक अतिशय उत्कृष्ट सेवक आहे. पण कधी कधी तो महाभयंकरसुद्धा होतो. महाभयंकर म्हणजे पैशाचा दुरुपयोग. अर्थातच घातक कृत्य करणे म्हणजे हे अग्नीपेक्षाही घातक आहेत. काळा पैसा याचा ढोबळ अर्थ असा की जो कायदेशीर व्यवहारात वापरला जात नाही, पण क्रियाकल्पाद्वारे कमवलेला पैसा त्याचा कोणताही कर भरला जात नाही, म्हणजे त्यातून सरकारला उत्पन्न मिळत नाही.

अर्थातच या पैशाची सरकार दरबारी नोंद नसते व बँकेतही ठेवला जात नाही. म्हणजेच अवैध मार्गाने कमवलेला पैसा काळा पैसा म्हणून किंवा काळे धन म्हणून संबोधला जातो. बऱ्याचदा तो रोख रकमेतच साठवला जातो. खंडणी/तस्करी/भ्रष्टाचार/लाच/पगडी/अनुदान/मदत/मनी लॉन्ड्रीग/अमलीपदार्थांची तस्करी/अर्थात उलाढाल अशा अनेक मार्गांनी काळा पैसा निर्माण होतो. सध्याच्या कालावधीत काळा पैसा निर्माण करण्यात राजकारणी आणि सरकारी नोकरशहा यांचा मोठा हात आहे. सरकारी विकास योजना अंमलबजावणीसाठी कंत्राटदार मोठी रक्कम काळ्या पैशाच्या स्वरूपात राजकारणी व अधिकारी यांना देतात. सरकारी सार्वजनिक कंपन्या/खनिज तेल विक्री/सरकारी बँकेमध्ये थकलेले थकीत कर्जाचे सेटलमेंट करण्यासाठी मोठमोठ्या रक्कम स्वीकारल्या जातात. अवैधरित्या आणि नियमात सूट देऊन मोठ्या उद्योगपतीस परवानगी देऊन त्यात निर्मित झालेला काळा पैसा राजकारणी अर्थात राजकीय पक्ष हे संकटकाळी वापरतात. खासगी व्यावसायिक सर्व उत्पादनाचे स्रोत जाहीर न करता स्वतः बेहिशेबी मालमत्ता व रोकड ठेवतात. अनिवासी भारतीय व काही भारतीय टॅक्स हेवन देशात गुंतवणूक करून करोडो रुपयांची करबुडी करतात.

स्वीस बँकेत अनेक वर्षांपासून भारतीयांचा काळा पैसा पडलेला आहे, त्याचा वापर निवडणुकीच्या वेळी केला जातो. तर डळमळीत सरकारला स्थिरपणा आणण्यासाठी पैशाचा घोडा बाजार करून वापर केला जातो. हे काळ्या पैशाचे स्वरूप आहे. भारतीय लोकशाहीच्या निवडणूक खर्चाच्या मर्यादा ओलांडून खर्च होत आहे. मर्यादेपेक्षा अनेक पटीमध्ये खर्चाचे व्यवहार चालतात. निवडणूक प्रचार यंत्रणेचा खर्च, त्याचबरोबर मोठमोठ्या सभेचा खर्च आणि प्रसिद्धी माध्यमात देण्यात येणारे करोडो रुपये याची मोजदाद करणे अवघड आहे.

हे सामाजिक सत्य आहे. मतदाराला आश्वासने व थोडीशी चिरीमिरी देण्यात येते. त्यामुळे आज तरी देशात नागरिकाची पंख छाटलेल्या पक्ष्यासारखी अवस्था झाली आहे. पंख निघूनही दाणे खावेच लागतात. एक दिवस परत बळी! असले प्रकार सर्रास दिसून येतात. काळ्या पैशाचा सुळसुळाट देशाच्या आर्थिक वाढीवर म्हणजे देशाच्या विकासावर परिणाम करतो, सरकारचा महसूल बुडतो, बँकांमध्ये ठेवी कमी होऊन गरीब व उद्योजकास कर्ज मिळत नाही.ज्या देशात काळा पैसा जास्त त्या देशाची आर्थिक प्रगती खुंटते व तो देश रसातळाला जातो, हा अर्थशास्त्राचा नियम आहे. काळ्या पैशामुळे तस्करी/गुंडगिरी/गुन्हेगारी/भ्रष्टाचार असे अपकृत्यं निर्माण होतात. सरकारी यंत्रणा भ्रष्ट होते/वस्तूच्या किमती वाढतात, मग त्याचा ताण गरिबांच्या खिशावर पडतो. काळा पैसा असला आणि त्याच्यावर कर भरला तर तो पांढरा होतो. कर नाही भरला तर काळा पैसा, असे आपण म्हणू शकतो. केवळ कर भरण्यामुळे काळाचा रंग पांढरा होतो. नोटबंदीमध्ये जवळील काळ्या पैशाची रोख रक्कम बँकेत भरल्याबरोबर अर्थात हिशेबात आल्याबरोबर तो लगेच पांढरा! काही वर्षांच्या कालखंडानंतर सरकारच्या काळा पैसा व संपत्ती रोखण्यासाठी ऐच्छिक प्रगटीकरण योजना येणे आवश्यक आहे. बेकायदेशीरपणे पैसा न कमावण्याचा मार्ग स्वीकारणे, असा नागरिकांनी संकल्प करणे गरजेचे आहे. बेकायदेशीर करबुडी व काळा पैसा यास कारणीभूत असणार्यास कठोर शिक्षा अपेक्षित आहे. सध्याच्या कायद्यातील त्रुटी दूर करून नवीन कठोर कायदे करणे नितांत गरजेचे आहे. सत्य परिस्थितीचे आकलन करून स्वतः नागरिकांनी बदल घडवून आणणे, हाच आजच्या काळातील उपाय आहे, नाहीतर देश संकटखाईत ओढला जाईल.

संत तुकाराम महाराज म्हणतात

जोडोनिया धन उत्तम वव्हारे । उदास विचारे वेच करी ॥

याचा अर्थ असा आहे की, उत्तम प्रामाणिक व्यवहार करून धन जोडणे चांगले. नीच व दोन नंबरच्या व्यवहारात कधीही समाधान मिळत नाही. उत्तम धंदा/ व्यवसाय याने धन कमावले, तर त्याचा विनियोग चांगला होतो. योग्य मार्गाने पैसा खर्च करून खर्च करताना प्रसन्न मनाने करा! अर्थात, उदासीनता कोणतीही नको. त्याचबरोबर अशा मनुष्यास उत्तम मिळून सुख लाभते.

# माजी विरोधी पक्ष नेते आप्पासाहेब चौगुले यांनी दिला भाजप सदस्यत्वाचा राजीनामा

## आ. सुभाष देशमुख यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून निर्णय घेतल्याचा आरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर हद्दवाढ विभागात भाजपची पहिली शाखा सुरू केली. महापालिकेतील विरोधी पक्ष नेतेपद भूषविले. तीस वर्षापासून कार्यरत असलेल्या जुन्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांना भाजपात स्थान नाही. पक्षात नेत्यांची गटबाजी वाढली. पक्षापेक्षा स्वतःला मोठे असल्याचे नेत्यांना वाटणे हे चुकीचे आहे. अशा परिस्थितीत पक्षात काम करणे अवघड आहे. त्यामुळे आ. सुभाष देशमुख यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून अखेर भाजपा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याची भूमिका माजी विरोधी पक्ष नेते आप्पासाहेब चौगुले यांनी पत्रकार परिषदेत मांडली.

दक्षिण विधानसभा मतदारसंघातून आमदार सुभाष देशमुख यांना भाजपने उमेदवारी देऊ नये अशी मागणी भाजपच्याच माजी नगरसेवकांनी यापूर्वी केली होती. त्यानंतर आज भाजपचे माजी विरोधी पक्ष नेते आप्पासाहेब चौगुले यांनी भाजपामध्ये जुन्या निष्ठावंत अभ्यासू कार्यकर्त्यांची कदर नाही. त्यांना स्थान नाही. विचारात घेतले जात नाही. भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून अखेर भाजपा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले. यामुळे भाजपला हा मोठा धक्का मानला जात आहे. भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्याकडे हा राजीनामा दिला आहे. त्याचबरोबर भाजपचे प्रदेशाध्यक्ष यांच्याकडेही मेल द्वारे हा राजीनामा पाठविण्यात आला असल्याचे चौगुले यांनी स्पष्ट केले.

माजी विरोधी पक्ष नेते आप्पासाहेब चौगुले पुढे म्हणाले, हद्दवाढ भागामध्ये तीस वर्षापूर्वी भाजपची पहिली शाखा सुरू केली. पक्ष वाढवला. दरम्यानच्या काळात नगरसेवक आणि विरोधी पक्षनेते पदही भूषविले. पक्ष वाढीसाठी मोठा संघर्ष केला. या परिसरात बुथ यंत्रणा सक्षम केली होती.

दरम्यानच्या काळात गेल्या दहा वर्षापासून भाजपामध्ये गटबाजी वाढली आहे. शिस्त राहिली नाही. संघटना विस्कळीत झाली आहे. मला लोक भाजपचा कार्यकर्ता मानतात मात्र दुसरीकडे आतापर्यंत झालेल्या विविध निवडणुकांवेळी पक्षातील पदाधिकाऱ्यांनी, आमदारांनी मला विसरले. आमच्याकडे कोणीही आले नाही. तरीही मी पक्षाचे जबाबदारीने काम केले. दक्षिण मतदार संघातील आमदार असूनही सुभाष देशमुख यांच्याशी कधीही साधे बोलणे झाले नाही. कधीही त्यांनी विचारले नाही. कालपर्यंत पक्षाची वाट पाहिली. सक्रिय व्हा म्हणतील अशी अपेक्षा होती मात्र कोणीही बोलावले नाही. सामाजिक भूमिका घेऊन राजकारणात काम करत आहे.

पक्षापेक्षा नेत्यांना स्वतःचे राजकारण आणि गटबाजी महत्त्वाची वाटते. अशा परिस्थितीत काम करणे अवघड आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यपद्धतीला मी कंटाळलो. त्यांनी पक्षात स्वतःचा एक पक्ष स्थापन केला असल्याची स्थिती आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्थान नाही असा आरोप चौगुले यांनी केला. स्वाभिमान गहाण ठेवून काम करणे मला शक्य नाही. काल आलेल्या लोकांनी आम्हाला भाजप सांगणे चुकीचे आहे. आमदार सुभाष देशमुख यांनी आमच्याशी संपर्क ठेवला पाहिजे होता मात्र अपेक्षा फोल ठरली. ते लोकमंगलचे नेते आहेत असेच वाटते. माझ्यासारख्या अनेक जुन्या कार्यकर्त्यांचा विचार केला जात नाही, असा आरोप चौगुले यांनी केला.

महापालिकेच्या इतिहासात भाजपला प्रथमच महापालिकेत सत्ता मिळाली मात्र म्हणावे तसे काम करण्यात आले नाही. आलेली संधी घालवली. स्मार्ट सिटी योजना नेटक्या पद्धतीने राबवली नाही. यामुळे उलट पक्षाची प्रतिमा खराब झाली. पक्षापेक्षा स्वतः मोठा असे नेत्यांना वाटणे चुकीचे आहे. ते पक्षासाठी हानिकारक असते, असेही अप्पासाहेब चौगुले यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत प्रा. डॉ. संतोष मेटकरी उपस्थित होते.

### आज पुढील दिशा ठरविणार !

दरम्यान, आज भाजप पक्ष सदस्यत्वाचा मी राजीनामा दिला आहे मात्र पुढील राजकीय भूमिका ठरविण्यासाठी रविवार दि. 17 नोव्हेंबर रोजी दुपारी कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानंतरच पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे. राजकारणात चांगल्या लोकांची गरज आहे. त्या दृष्टीनेच पुढील दिशा ठरविण्यात येणार असल्याचेही माजी विरोधी पक्षनेते आप्पासाहेब चौगुले यांनी स्पष्ट केले.

### आता पक्ष वाचविण्यासाठी आमच्याच लोकांशी संघर्ष

आम्ही यापूर्वी भाजपा पक्ष वाढविण्यासाठी विरोधकांशी संघर्ष केला. आता पक्ष वाचविण्यासाठी आमच्याच लोकांशी संघर्ष करावा लागत आहे. ही एक शोकांतिका आहे.

सद्यस्थितीत राजकारणात चांगल्या लोकांची गरज आहे. परिवर्तन झाले पाहिजे तरच शहराचा विकास होऊ शकतो. त्यामुळे हीच योग्य वेळ आहे असे समजून मी भाजप पक्ष सदस्यताच्या राजीनामा दिला असल्याचे आप्पासाहेब चौगुले यांनी स्पष्ट केले.

## प्रबोधन

# शुद्ध बुद्धीनेच । साधते प्रगती

जगातील सर्व श्रद्धाळू लोकांना नक्की आवडेल, असा एक विचार लोकमान्य टिळकांनी दिला. ते म्हणाले, 'जेथे बुद्धीचे क्षेत्र संपते, तेथे श्रद्धेचे क्षेत्र सुरू होते.' याचा अर्थ, जे पूर्वायुष्यात बुद्धिवादी असतात ते उत्तरायुष्यात श्रद्धाळू होतात, असा तरी होईल किंवा बुद्धीचा प्रवास आखूड आहे; मात्र श्रद्धेचा प्रवास दीर्घ आहे, असा घेता येईल. किंवा श्रद्धा ही बौद्धिकतेचा पराभव करते, असा घ्यावा लागेल. वास्तविक हा विचार मांडताना टिळकांनी गीतारहस्य लिहून ज्या कर्मयोगाचा हिरिरीने पुरस्कार केला, तो स्वतःच्याच हाताने मोडीत काढला; कारण कर्मयोगी माणूस कर्मनिष्ठ, कर्मयोगाला, स्वीकृत कायार्ला समर्पित झालेला असतो आणि फालतू श्रद्धा जोपासायला त्याला वेळ नसतो. गंमतीची गोष्ट अशी की, ज्या टिळकांनी हा विचार मांडला ते बुद्धिवादी संपादक होते, श्रद्धावादी भक्तभागवत नव्हे!

बुद्धी थांबते तेव्हा श्रद्धा माणसाचा कब्जा घेते आणि जेव्हा श्रद्धेसाठी श्रद्धा असं वर्तन माणसाकडून घडू लागतं, तेव्हा तो अंधश्रद्धाळू होतो. पण बुद्धी संपते किंवा थांबते, हे खरं आहे काय? एकदा बुद्धी थांबल्यावर पुन्हा ती गतिमान होतच नाही काय? श्रद्धेच्या व्यवहारात बुद्धीचं स्फुरण नसतंच काय? वास्तविक बुद्धीनंतर श्रद्धा आणि श्रद्धेनंतर बुद्धी अशी मानवी जीवनात अनेक आवर्तनं होत असतात, त्यांचा विचार येथे का केला जात नाही? श्रद्धा आणि बुद्धी यांच्या लाटा एकामागून दुसरी अशा येतात, हे मान्यच केलं पाहिजे. उदाहरणार्थ, श्रद्धाळू डॉक्टर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी श्रद्धाळू होऊन प्रार्थना करतो. पण शस्त्रक्रिया करताना बुद्धीचा पुरेपूर उपयोग करून ती यशस्वीपणे पार पाडतो. त्याने बुद्धीचा आश्रय घेतला नाही तर रोगी जिवंत राहील का? बरीच माणसं बौद्धिक जीवन जगून श्रद्धेच्या आहारी जातात, हे जितकं खरं, तितकंच बरीच माणसं धर्मकर्म-उपासना या सव्यापसव्याला विटून बौद्धिक होऊन जीवनाचा मुक्त आनंद घेऊन खरोखरचं सुखी जीवन निर्भय होऊन जगतात, हेसुद्धा खरं आहे. श्रद्धाळू मनुष्य बुद्धिवादी झाला, तर सुबह का भूला शाम को घर लौट आता है तो भूला नहीं कहलाता, असं म्हणता येईल. पण बुद्धिवादी माणूस श्रद्धावादी झाला, तर मात्र ते समाजमनाला पसंत पडत नाही. करून करून भागला आणि देवपूजेला लागला, अशी त्याची निंदा लोक करतात.

मात्र बुद्धिवादाच्या जोपासनेत जे खरोखर गुंतलेले आहेत, ते कधीही श्रद्धाळू होत नसतात. त्यांना जो आनंद लाभतो त्याची कल्पना श्रद्धेच्या कुबडाला गोंजारत बसणाऱ्यांना कधीही करता येणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'शिक्षक हा आजन्म विद्यार्थीच असतो.' अर्थात, खरा शिक्षक जन्मभर बुद्धीच्या क्षेत्रातच वावरला पाहिजे. त्याचं बुद्धीचं क्षेत्र कधी संपतच नाही. त्यामुळे श्रद्धेचं क्षेत्र सुरू होण्याचा प्रश्न त्याच्यापुढे कधी उभा राहात नाही. श्रद्धा आणि बुद्धी यांची भेसळ ज्याच्या मेंदूत झाली आहे, तो मात्र ज्ञानाचं पवित्र वातावरण दूषित करतो. लोकहितवादी देशमुखांनी आपल्या शतपत्रातून अशा पढतमूखांर्ची खरडपट्टी खूप काढली. डॉ.आंबेडकरांप्रमाणेच विश्वकवी टागोरही म्हणतात, 'जोवर दिवा स्वतः पेटत असतो, तोवर त्या दिव्याने दुसरा दिवा पेटवता येतो.' धगधगत्या ज्ञानसाधनेत आपलं व्यक्तिमत्त्व जो वितळवून टाकतो, तोच खरा शिक्षक! श्रद्धाळू शिक्षक म्हणजे विझलेला दिवा विझलेला दिवा दुसऱ्या दिव्याला पेटवू शकत नाही.

बुद्धीचं सोनं अभ्यासाच्या अग्नीमध्ये टाकून रोजच्या रोज शुद्ध करावं लागतं. आयुष्यात एकदा गुरू करून घेणाऱ्या जुनाट श्रद्धाळूंना हे अग्निदिव्य झेपणार नाही. खऱ्या शिक्षकाला तर कोणत्याच गुरूची गरज नसते. त्याच्या ठिकाणी स्वयंप्रज्ञा, स्वयंप्रकाशीपणा निर्माण झालेला असतो. असिधाराव्रत हा शब्द ज्ञानतपस्येलाच छान लागू पडतो. आपल्या बुद्धीच्या तलवारीने आपण जखमी झालो तरी चालेल. पण श्रद्धेच्या दमट हवेने तिचं पातं गंजणार नाही, याची काळजी खरा बुद्धिवादी सतत घेत असतो. कारण- श्रद्धावान लभते ज्ञानम अर्थात, श्रद्धाळू माणूसच ज्ञान प्राप्त करू शकतो, असा मुळातच दूषित झालेला विचार तुम्हालाही चालत नाही. त्याजागी ज्ञानार्थी लभते ज्ञानम, अर्थात, ज्ञानाची तीव्र इच्छा ज्याला आहे त्यालाच ज्ञान मिळतं, श्रद्धेने प्रारंभ झाला की, देवधर्माचं थोतांड, आध्यात्मिकतेचं एरंडाचं गुऱ्हाळ, आत्मिक उन्नतीची चर्पटपंजरी, आत्मा-परमात्म्याच्या गांजेकस मैफली रंगायला वेळ लागत नाही. म्हणून शहाणा मनुष्य यापासून दूर राहातो. त्यासाठी लक्षात ठेवा-

विद्येविना मती । जाते म्हणे जोती।
मतिविना नीती। भ्रष्ट होते ॥ १
नीतिविना गती। जीवनास नासे।
गतिविना नासे । धनप्राप्ती ॥२
धनप्राप्तीविना । दारिद्र्य येतसे।
जगणे होतसे । लाचारीचे ॥ ३
म्हणूनी करावी। विद्याप्राप्ती आधी ।
नंतरचि साधी । अन्य सारे ॥४
बुद्धीने उद्योग। व्यवसाय करा।
समृद्धी ये घरा । कायमची ॥५
शुद्ध बुद्धीनेच। साधते प्रगती।
बुद्धीने पळती । विघ्ने सारी ॥६
विद्याप्राप्ती हाच । असे पुरुषार्थ ।
बुद्धीमध्ये अर्थ । सामर्थ्याचा ॥ ७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मतदारांना सुविधा तर आचार संहितेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा : विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांचे निर्देश

**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांना विनासायास मतदान करता यावे, त्यांच्यातही उत्साह वृद्धींगत व्हावा यासह पुरेशा सुरक्षित वातावरणासह अधिक सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी तत्पर राहा. याचबरोबर कुठे जर शांतता भंग करण्याचा अथवा आचारसंहितेचे उल्लंघन करून कोणी जर वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्याविरुद्ध तत्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी दिले.



जिल्ह्यात 20 नोव्हेंबर रोजी होणा-या मतदानाच्या पूर्वतयारीबाबत विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. मेट्रो भवन येथे आयोजित या बैठकीस पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, निवडणूक निरीक्षक के. वासुकी,नवीन कुमार सिंग, पवन कुमार सिन्हा, अरुण कुमार परमार, संजय कुमार, भोर सिंग यादव, सुनील कुमार, निवडणूक निरीक्षक (पोलिस) अजय कुमार, निवडणूक निरीक्षक (खर्च) देवरंजन मिश्रा, संतोष कुमार मिश्रा, दीपक आनंद, पोलिस अधीक्षक (ग्रामीण) हर्ष पोद्दार, नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे उपस्थित होते.

मतदान केंद्रांवरील पार्किंग व्यवस्थेपासून ते मतदानापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेपर्यंत मतदारांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबत निवडणूक विभागाने स्थानिक पातळीवर यथाशक्य सुविधा पुरविल्या पाहिजे. निर्भय व निरपेक्ष वातावरणात मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता आला पाहिजे. कुठल्याही प्रकारचा अडथळा हा मतदारांना मतदानाच्या दिवशी येऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी निर्देश दिले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेच्या तयारीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. जिल्ह्यात एकूण 45 लाख 25 हजार 997 मतदार आहेत. यात पुरुष मतदारांची संख्या 22 लाख 63 हजार 890 आहे. तर महिला मतदारांची संख्या 22 लाख 61 हजार 805 आहे. तर 302 तृतीयपंथी मतदार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार, मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणा-या सुविधा, निवडणुकीसाठी उपलब्ध असलेले मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्था आदी निवडणूक यंत्रणेच्या तयारी माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे दिली.

जिल्हा निवडणूक यंत्रणेच्या तयारीचे यावेळी विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी कौतुक केले.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलिस विभागाने घेतलेल्या दक्षतेची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी दिली. संवेदनशील भागात ड्रोनद्वारे लक्ष ठेवण्यात येत असून यात रात्रीही निगराणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेणा-यांविरुद्ध पोलिस कठोर कारवाई करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सत्ता मिळवण्यासाठी धनगरांचा...

कोंडूभैरी, माजी उपसभापती दादासाहेब गरंडे, माजी सरपंच बाळासाहेब गरंडे, रड्डेचे माजी सरपंच सुरेश कांबळे, धनाजी गडदे, उपसरपंच आनंदा पाटील, किसन करे, काशिलिंग करे, माजी उपसरपंच अंकुश कांबळे, आप्पासाहेब मेटकरी, युवराज बंडगर, अंकुश गरंडे, सुनील कसबे, तुकाराम गरंडे, ज्ञानू गरंडे भाऊसाहेब गरंडे, भाऊसाहेब सलगर हे उपस्थित होते. यावेळी बोलताना संग्राम माने म्हणाले की, दुष्काळी भागाला आजपर्यंत सर्वच लोकप्रतिनिधींनी फसविले आहे. पण अनिल सावंत यांनी मात्र भैरवनाथ शुगरच्या माध्यमातून इथल्या शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव दिला व बेरोजगारांना इथेच रोजगार उपलब्ध करून दिला आहे. अनिल सावंत हे इतर लोकप्रतिनिधींसारखे फसवा फसवी न करता ते करतात आणि मग बोलतात अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे आणि असा लोकप्रतिनिधी जर आपल्या मतदारसंघाला मिळाला तरच आपला विकास होणार आहे.

यावेळी बोलताना उमेदवार अनिल सावंत म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात असू द्यात आपला वाढप्या ओळखीचा असला की ते काम अगदी सहजासहजी होऊन जाते. त्यामुळे मला तुमचा ओळखीचा वाढप्या समजून सहकार्य करा. मी तुमच्या पदरात नेहमीच वाढता घास टाकेन. आणि मंगळवेढा तालुक्याच्या दुष्काळी भागासहित संपूर्ण मतदारसंघाचा विकास करेन.

पान १ वरून

## यशवंताला पुन्हा एकदा आमदार करा...

क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. या योजनेसाठी प्रत्येकी २५० कोटी प्रमाणे ५४० कोटी रुपयांचा निधी उपसा सिंचन योजनेसाठी दिलेला आहे. निधी कमी पडू दिला नाही लोकसभेच्या वेळी मी मोहोळ येथे झालेल्या सभेत शेतकऱ्यांची वीज बिल झिरो करणार असा शब्द दिला होता. त्यानुसार तीन, पाच व साडेसात हॉर्स पावर चे विज बिल झिरो करण्यात आलेले आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बोलताना महायुतीचे उमेदवार यशवंत माने म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनील तटकरे आणि माजी आमदार राजन पाटील यांच्यामुळे मला या मतदारसंघातून दुसऱ्या वेळी संधी दिली. मागील पाच वर्षात या मतदारसंघात विकासाची गंगा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून साडेचार हजार कोटी रुपयांची कामे मंजूर होऊन काही कामांना सुरुवात झाली आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामासाठी १०५० कोटी रुपये, ग्रामविकास विभागातील कामासाठी ३४१ कोटी रुपये, नगर विकास विभागातील मार्फत ३५७ कोटी रुपये जलसंपदा विभागामार्फत आष्टी शिरापूर योजनेसाठी दोन प्रत्येकी २५० कोटी रुपये प्रमाणे ५४० कोटी रुपये, क्रीडा संकुल मोहोळ येथे बांधण्यासाठी पाच कोटी रुपयांचा मंजुरी मिळून ते काम सुरू झाले आहे. तर जलसंपदा विभागातील मार्फत ११३ कोटी यासह इतर विकास कामे मार्गी लागली आहेत.

यावेळी बोलताना राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा मोहोळचे माजी आमदार राजन पाटील म्हणाले की, केवळ गेल्या तीन वर्षामध्ये मोहोळ मतदार संघाचा विकास खूप मोठ्या प्रमाणावर झाला आहे. अजित दादांनी आपल्या मतदारसंघावर विशेष लक्ष दिल्यामुळे बारामती पेक्षाही सूतभर जास्त लक्ष देऊन विकासाची गंगा आणली आह.

आमदार यशवंत माने हे सोलापूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारापेक्षा भरघोस मतांनी निवडून येतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला . उमेश पाटील यांना टोला लावताना ते म्हणाले की, दादा तुम्ही प्रदेशाध्यक्ष पदी निवड केली होती त्या पदावर त्यांना तुम्ही काढले होते. परंतु आम्ही आग्रह करून त्यांना त्या पदावर ठेवायला लावले. पण आज हे कळतंय की ती आमची सर्वात मोठी चूक होती. मोहोळ मतदार संघासाठी अतिशय तळमळीने काम करणारा माणूस म्हणून यशवंत माने आहेत आणि विकास करणाऱ्याच्या मागे मोहोळ मतदार संघातील जनता काही उभी राहते म्हणून या निवडणुकीत आमदार यशवंत माने हे प्रचंड बहुमताने विजयी होतील असा मला विश्वास आहे.

प्रशांत परिचारक म्हणाले की महाराष्ट्रातील पुढील पंचवीस वर्षात भवितव्याची पायाभरणी करण्यासाठी महायुतीचे उमेदवार आमदार यशवंत माने यांना निवडून देण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील सतरा गावांमधून मोठा लीड आम्ही त्यांना देऊ असा असे आश्वासन त्यांनी यावेळी बोलताना दिले.

## वात्रटिका

### घोषणा आणि घोषणा

निवडणूकीच्या ढगातून
आश्वासनाचा पाऊस आहे...
लाडक्या बहिणीची आता
दोन्ही कडून हौस आहे...
भावांच्या घोषणाबाजीने
बहिणीचा चेहरा खुलला...
मोका साधला मेहुण्याने
आणि दाजी हिरमुसला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गुळपोळी येथे श्री भैरवनाथ जयंती निमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह



**बार्शी(कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील जागृत देवस्थान म्हणून गुळपोळी येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचे मंदिर सोलापूर जिल्ह्यात प्रसिद्ध आहे.गुळपोळी येथे सालाबाद प्रमाणे श्री भैरवनाथ जयंती निमित्त वर्ष दुसरे अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, अखंड नामजप यज्ञ सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन 16 नोव्हेंबर पासून करण्यात आले आहे.याची रूपरेषा अशी असणार आहे,पहाटे 5 ते 6 काकडा आरती भजन, सकाळी 7 ते 11 ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,11 ते 12 तुकाराम गाथा भजन,दुपारी 12 वाजता भैरवनाथ महाराजांची आरती, सायंकाळी 7 ते 8 हरिपाठ, सायंकाळी 9 ते 11 हरिकीर्तन सेवा,सायंकाळी 11 ते 12 हरिजागर,असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत.या सप्ताहामध्ये ह.भ.प.देविदास दस गुरुजी महाराज खडकलगाव ह.भ.प.रामचंद्र विठ्ठल गायकवाड महाराज सत्संग आश्रम महादेव टेकडी,ह.भ.प.नवनाथ महाराज साठे ढग पिंपरी,ह.भ.प.श्री कालिदास महाराज झांबरे बार्शी,ह.भ.प. भाऊसाहेब महाराज कदम घाटणे,ह.भ.प. उद्धव गरड महाराज लऊळ तालुका माढा,ह.भ.प.शेळके महाराज सत्संग आश्रम व्यासपीठ चालक, ह.भ.प.आप्पा महाराज जावळे हळदगाव,या नामवंत कीर्तनकारांची हरिकीर्तन सेवा होणार आहेत. अखंड हरिनाम सप्ताह चा कार्यक्रम दिनांक 16/ 11/ 2024 ,रोजी सुरू झाला असून कार्यक्रमाची सांगता 23/ 11/2024 रोजी सकाळी 9 ते 11,या वेळेत ह.भ.प.आप्पा महाराज जावळे हळदगाव यांचे काल्याचे हरिकीर्तन सेवेने अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता होईल.त्यानंतर सौ वंदना रामचंद्र उबाळे,श्री रामचंद्र बापूराव उबाळे,चि.अभिजीत रामचंद्र उबाळे,चि.अमित रामचंद्र उबाळे,कुमारी अंकीता रामचंद्र उबाळे राहणार दारफळ सीना यांचे वतीने महाप्रसाद भोजन पंगत होणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन श्री भैरवनाथ नवरात्र उत्सव व अन्नदान मंडळ व समस्त गुळपोळी ग्रामस्थ यांच्या वतीने केले जाणार आहे. सर्व भाविकांनी संपूर्ण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती श्री भैरवनाथ नवरात्र उत्सव व अन्नदान मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत गोविंद चिकणे,भजनी मंडळ अध्यक्ष लक्ष्मण मधुकर मचाले,तंटामुक्त उपाध्यक्ष हनुमंत लक्ष्मण पाटील,मृदंगाचार्य राहुल मोहन मचाले,मंदिर व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी सूर्यकांत चिकणे व प्रेम परमेश्वर मचाले, अतुल सूर्यकांत चिकणे,राजेंद्र अभिमान चिकणे, बाळकृष्ण दत्तात्रय पिसे, शांतिनाथ जनार्दन चिकणे, अथर्व धनाजी शिंदे,सौ रेखा सूर्यकांत चिकणे,सागर सुनील चिकणे,सागर अनिल पाटील,आकाश लहू चिकणे यांनी संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील भाविकांना सदर कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती केली आहे.

# मी दिलेला शब्द पाळणार - आ. सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-**मागील विधानसभा निवडणुकीत या भागातील एकही रस्ता खड्डेमय दिसणार नाही, असा मी तुम्हाला शब्द दिला होता. त्याची पूर्तता करूनच पुन्हा मी तुमच्यासमोर मतदान मागायला आलो आहे. मी दिलेला शब्द पाळणारा आहे, असा विश्वास अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील तडवळ येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर चंद्रकांत पाटील, परमेश्वर यादवाड, संजय देशमुख, रामचंद्र अरवत, अविनाश मडीखांबे, सुरेश सद्दलगी, सुरेश गड्डी, दिलीप सिद्धे, अण्णाप्पा याबाजी, डॉ. अशोक हिप्परगी, विकी ईश्वरकट्टी, अजय मुकणार, बाबुशा करपे आदी उपस्थित होते. यावेळी आ. कल्याणशेट्टी पुढे म्हणाले, गेल्या पाच वर्षांत गावात मोठ्या प्रमाणात रस्त्यांची कामे करण्यात आली. काही ठिकाणी नवीन रस्त्यांची बांधणी, काही ठिकाणी दुरुस्ती, तर डांबरीकरणाची कामे करण्यात आली. रस्त्यांचे जाळे विस्तारल्यामुळे गावकऱ्यांना मोठा फायदा झाला. तसेच तडवळ गावात बंदिस्त गटारे, देवीच्या मंदिरांसमोर आणि जगद्गुरू हडपद आप्पण्णा महाराज संस्था मठासमोर सभामंडप बांधणे, तडवळ ते सुलेरजवळगे रस्ता, आळगे ते तडवळ रस्ता, पानमंगळूर ते तडवळ मुंढेवाडी, कोसेगांव रस्ता, सुलेरजवळगे तडवळ, अंकलगे रस्ता टप्पा १ आणि २, तडवळ ते आळगी रस्ता, तडवळ ते म्हैसलगी रस्ता, गुड्डेवाडी ते तडवळ रस्ता, तडवळ ते अंकलगी आणि खानापूरपर्यंत असे रस्ते तयार करणे अशी विकासाची कामे मंजूर झाली आहेत. याशिवाय भीमनगर येथे सिमेंट रस्ता करणे, अंकलगी गेट ते बुळकावस्तीपर्यंत पाणंद रस्ता करणे, नवीन अंगणवाडी बांधणे, अक्कलकोट, जेऊर, करजगी, पानमंगरुळ, तळवड, कोसेगांव रस्ता सुधारणा करणे, जलजीवन मिशनअंतर्गत नळाद्वारे पाणीपुरवठा करणे ही कामे मंजूर झाली आहेत. यावेळी आळगे, शेगाव, गुड्डेवाडी, मुंडेवाडी, कल्लकर्जाळ, सुलेरजवळगे, धारसंग, केगाव खु केगाव बु, चिंचोळी आदी गावांमध्ये दौरा झाला.

यावेळी महादेव दोड्याळे, सिद्धाराम उमदी, सागर हिप्परगी, अजिज सुतार, स्वामी सरपंच, अनिल पाटील, विठ्ठल विजापुरे, बाबुशा कोडते, सैपन पटेल, बाबा टक्कळकी, शांतू कुंभार, शिवानंद मानशेट्टी, राघु याबाजी, अमित मानशेट्टी, हर्षद कुलकर्णी, कलाप्पा माळी, दयानंद उंबरजे, गुरु मुडगी, राजकुमार पाटील, शिवराज स्वामी, मल्लिनाथ करपे आदी उपस्थित होते.

**Format C-1**

(for candidate to publish in Newspapers, TV)

Declaration about criminal cases

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No 536 of 2011(Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate: Mr. SANTOSH SEVU PAVAR

Name of political party. : VANCHIT BAHUJAN AAGHADI

(Independent candidates should write "Independent" here)

Name of Election: FOR ELECTION TO MEMBER OF LEGISLATIVE ASSEMBLY, MAHARASHTRA

*Name of Constituency: 251, SOLAPUR SOUTH CONSTITUENCY

I, Mr. SANTOSH SEVU PAVAR (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal Cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of Cases(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(S) |
|---|---|---|---|---|
| 1 | Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court at Pimpri Pune | 215/2024 Sangvi Police Station, Sangavi Pune | Charge sheet filling | Arm Act 1956-Sec.25(3); IPC 1860- Sec.143, 146, 147, 326,148,149,504,506 |
| 2 | Sessions Case No. 181/2024 Hon'ble Sessions Court Pune | 58/2024 Sinhgad road Police Station, Pune | Unready Board ( charge ) | Arms Act, 1956-Sec.25(3) and IPC 1860- Sec.307,504,506, and The Maharashtra Police Act 1951- Sec.135 |
| 3 | S.C.C. No. 34707/2016 Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court Pune | 3010/2016 Bandgardan Police Station,Pune | Unready Board | Bombay Police Act Sec. 37(1),(3) r/w 135 |
| 4 | R.C.C. No. 1361/2009 Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court Solapur | 107/2009 Faujdar Chawadi Solapur, Solapur | Unready Board(discharge application) | IPC 1860 – Sec. 420, 467, 468,471 r/w 34 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No | Name of Court & date(s) of order(s) | Description of office(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil |

# सुविधांपासून वंचित ठेवलेल्यांना खड्या सारखे बाजूला काढा - धर्मराज काडादी



**सोलापूर(कटूसत्यवृत्त):-** गेल्या दहा वर्षामध्ये तुम्ही निवडून दिलेले आणि तुम्हाला मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित ठेवलेले लोकप्रतिनिधी या भागाकडे फिरकले का, अशांना तुम्ही निवडून देणार का, असा सवाल करुन अशा लोकप्रतिनिधीला खड्यासारखे बाजूला काढा असे आवाहन करून या निवडणुकीत मला साथ आणि आशीर्वाद देऊन संधी द्या.या संधीचे आपण सोने करु आणि या मतदारसंघाचा विकास घडवून आणू, अशी ग्वाही सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तथा सिद्धेश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनी दिली.

शनिवारी, नीलमनगर भागात आयोजित केलेल्या पदयात्रे दरम्यान काडादी बोलत होते. या पदयात्रेत ज्येष्ठ विधीज्ञ मिलिंद थोबडे, माजी उपमहापौर अप्पाशा म्हेत्रे, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिद्धाराम चाकोते, ज्येष्ठ नेते सुरेश फलमारी, प्रा. अशोक निंबर्गी, सुरेश झळकी, उत्तम पाटील, प्रा. धर्मराज हंद्राळ, सामाजिक कार्यकर्ते बसवराज उडचाण, मनोहर माचर्ला, बालाजी कोंडी, प्रसाद कदम, सुनील बळी, विनायक म्हेत्रे, संदीप म्हेत्रे, दरेप्पा म्हेत्रे, अशोक बिराजदार, लक्ष्मण झळकी, आप्पासाहेब माळी, श्रीकांत नवले, रवींद्र साखरे, केदार म्हेत्रे, श्रीकांत घोडके आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी काडादी यांचे फटाक्यांची आतषबाजी करत महिला मंडळींच्यावतीने औक्षण करुन जोरदार स्वागत करण्यात आले.

ॲड. थोबडे म्हणाले, यापुढे विकास पाहिजे असेल धर्मराज काडादी हे एकमेव नेतृत्व असून मतदारांनी त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहावे.

पदयात्रेदरम्यान, ह्यकाडादी साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैह्न या व अशा विविध घोषणांनी सारा परिसर दणाणून सोडण्यात आला. यावेळी मधुकर कोक्कूल, विजयकुमार हुंडेकरी, श्रीशैल आलदीप, संदीप म्हेत्रे, मनोज आडम यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभाग नोंदवून कॉम्प्युटर चिन्हावर बटण दाबून काडादी यांनाच निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

**ही लढाई मोठी आहेः काडादी**

नीलम नगर भागात आयोजित पदयात्रेवेळी नागरिकांना संबोधित करताना सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी म्हणाले, ही लढाई मोठी आहे. माझ्या एकट्याची ही लढाई नाही, मी तुमच्या कुटुंबातील एक सदस्य आहे.

त्यामुळे या भागातील मूलभूत सोयी-सुविधांसह तुमच्या मुलांच्या चांगल्या शिक्षण व रोजगारासाठी प्रयत्न करु. तुमचा आर्थिकस्तर उंचावू. परंतु, त्यासाठी तुम्ही एकजुटीने काम करुन आपल्याला निवडून द्यावे, असे आवाहनही काडादी यांनी केले

# सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारा राजकारणी म्हूणन सोमनाथ वैद्य यांची ओळख



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून सामाजिक कामातून स्वतःची ओळख निर्माण केलेले सोमनाथ वैद्य यांना जुळे सोलापूर व ग्रामीण भागातून विविध समाजाचा पाठींबा मिळत आहे.

सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारा राजकारणी म्हूणन सोमनाथ वैद्य यांची ओळख निर्माण होत आहे.

शुक्रवारी कैकाडी आणि पारधी समाजातील सिद्राम जाधव, जयश्री जाधव, लता जाधव, सागर जाधव, सिदराम गायकवाड, महादेव गायकवाड, शमाबाई गायकवाड, सुनील गायकवाड, कांता गायकवाड, अजय गायकवाड, कोमल गायकवाड, विलास जाधव, विशाल जाधव, विद्या जाधव, सुरक्षा जाधव, पूजा जाधव, लक्ष्मी जाधव उपस्थित होते.

## मतदार ओळखीसाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य बाबींचा समावेश

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करीता जे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र (EPIC) सादर करु शकत नाहीत असे मतदार त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त पुढीलप्रमाणे नमुद कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करु शकतील. आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँकापोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक , कामगार मंत्रालयाच्या योजने अंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्र जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारा नॅशनल पॉप्युलेशर रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्रराज्य सरकार/ सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना/आमदारांना जारी करण्यात आलेले

## जाहीर प्रसिद्धीकरण

कि.अर्ज नं.३३/२०२३

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

अब्दुल बुडण दरवाजकर वय - ६४ वर्षे, धंदा - शेती, रा. डोरले गल्ली, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि.सोलपूर. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा मुलगा फिरोज अब्दुल दरवाजकर याचा जन्म ता.२४/१०/१९८६ रोजी मौजे सय्यद वरवडे, ता.मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत सय्यद वरवडे, ता.मोहोळ, जि.सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरिता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमूद अर्जदार यांचा मुलगा फिरोज अब्दुल दरवाजकर याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत सय्यद वरवडे यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरिता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा दि. १४/१२/२०२४ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानिशी दिले असे.ता.४/११/२०२४

सही/-
(शिक्का)
तहसिलदार,मोहोळ


# Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर
अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर,
श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर,
काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
९४२२४६०३१९

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
9881361260

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
९९२२५२५२३७

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.







**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोन: 9552619752**
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०७



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

**शब्दकोडे क्र. १०६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | रे | श | रै | ना | | के | दा | र | जा | ध | व |
| ज | न | क | | म | क | र | | स | | ब | म |
| य | | | स | क | स | | का | ना | | ध | न |
| वि | रा | ट | | र | म | जा | न | | ड | बा | |
| खे | | पा | | ण | | व | | ना | क | | |
| पा | य | ल | ट | | स | ई | बा | ई | | | छ |
| टी | म | | न | व | ल | | व | ट | सा | वि | त्री |
| ल | स | | | र | वा | | ळ | | | शा | |
| | द | स | | क | र | | ट | र | फ | ल | |
| र | न | | ग | र | | रा | | सा | र | | ग्या |
| द्दी | | फो | ड | णी | | शि | वा | | व | खा | र |
| | श | र | द | | ई | द | | सॉ | री | | ह |

# अभिजीत आबांना मतदान म्हणजेच शिवबाबांना मतदान : स्वरूपाराणी मोहिते-पाटील



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ बोरगाव येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या की; राज्यातील दडपशाहीचे राजकारण नागरिकांना मान्य नाही. लोकसभा निवडणुकीत अभिजीत पाटील यांच्यावरही दबाव टाकण्याचे काम झाले. मात्र महाविकास आघाडीने सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानत आपल्या जाहीरनाम्यात विविध योजनांचा समावेश केला आहे. नागरिकांनी आपल्या हक्काचा माणूस म्हणून धैर्यशील मोहिते-पाटील यांना निवडून दिले. त्याच पद्धतीने दूरदृष्टी ठेवून प्रगतीसाठी आणि स्वच्छ कारभारासाठी आबांना मतदान म्हणजेच शिवबाबांना मतदान असे सांगत अभिजीत पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना शिवतेजसिंह मोहिते पाटील म्हणाले की या मतदारसंघात लोकप्रतिनिधींनी कोणतेही विकास काम केले नाही. सत्ता असो किंवा नसो विजयसिंह मोहिते-पाटील यांनी या मतदारसंघात काम केले आहे. पंधरा वषार्चा बॅकलॉक भरून काढला आहे. यामुळे माळशिरस तालुक्यातील १४ गावांनी कायम मोहिते पाटील कुटुंबीयांवर प्रेम केले आहे. मी निवडणूक लढवण्यास इच्छुक होतो मात्र मोठ्या दादांनी आणि शरद पवार साहेबांनी आम्हाला आदेश दिला की अभिजीत पाटील यांच्या पाठीशी उभे राहावा. या आदेशाचे पालन करून आम्ही अभिजीत पाटील यांचा जोरदार प्रचार करत आहोत. पंढरपूर मधील ४२ गावांमधून अभिजीत पाटील यांना २५ ते ३० हजार आणि माळशिरस तालुक्यातील गावांमधून बारा हजाराहून अधिक मताधिक्य मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की; राज्यात शरद पवारांनी परिवर्तनाचा एल्गार पुकारला याला साथ देऊन विजयदादांनी क्रांतीकारक निर्णय घेऊन लोकसभा निवडणुकीत यश मिळवले त्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पक्ष फोडीचे राजकारण झाले. चिन्हही काढून घेतले. या दडपशाहीच्या विरोधात आपल्याला काम करायचे आहे. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर सर्व घटकातील नागरिकांना न्याय देण्यासाठी पंचसूत्री योजना राबवण्यात येणार आहे. माढा मतदार संघात तीस वर्षात काय विकास केला असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगाराची सोय नाही. मतदार संघातील मूलभूत विकास होऊ शकला नाही. यासाठी काम केले पाहिजे. मतदारसंघात केळी संशोधन केंद्राची गरज आहे. माढा,मोडनिंब, करकंब, महाळुंग साठी निधी मिळवून देऊ, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊ, असा विश्वास देत त्यांनी दूध संघ बंद करून जागा विकल्या. शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर कर्ज काढले अशी टीका अपक्ष उमेदवार रंजित शिंदे यांच्यावर केली.

यावेळी त्यांनी मी मोहिते-पाटील यांच्या विचारावर काम करेन मी आमदार होणार नसून शिवतेजसिंह मोहिते-पाटील आमदार होणार आहेत असा विश्वास दिला.

# विरोधी उमेदवार खोटे पण रेटून बोलत करताहेत जनता व शेतकऱ्यांची दिशाभूल - आ.बबनराव शिंदे

## अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांच्या प्रचारार्थ दारफळ सीना येथे सभा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आजतागायत मतदारसंघातील सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांच्या हितासाठी वीज,जलसिंचन,रस्ते व ऊस गाळपाचे प्रश्न प्राधान्याने सोडविले.एकट्या दारफळ सीना व परिसरात विविध कामांसाठी ८00 कोटींची विकासकामे केली आहेत. तालुक्यात टेंभुर्णी व कुडूर्वाडी येथे दोन एमआयडीसी सुरू केल्या असून मोडनिंब येथे तिसरीला शासनाची मंजुरी घेतली आहे. साखर कारखाने व इतर संस्थांच्या माध्यमातून हजारों बेरोजगारांना रोजगार दिला आहे.लवकरच बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील 2500 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. नजिकच्या काळात खैराव-मानेगाव उपसासिंचन योजनेची टेंडर प्रक्रिया सुरू होणार आहे.सीना-भीमा नदीवर ठीकठिकाणी मोठे बॅरेजेस बांधले जाणार आहेत ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच शिवसेनेचे प्रा. शिवाजराव सावंत गट,पंढरपूर तालुक्यातील नेतेमंडळी,विठ्ठल व पांडुरंग परिवार,माजी सभापती शिवाजी कांबळे गट,रयत क्रांती संघटना,प्रहार शेतकरी संघटना, वडार माळी व मातंग समाजाने बिनशर्त अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे परंतु विरोधी उमेदवारांकडे विकासाची दृष्टी व व्हीजनचा अभाव आहे.ते विकासकामांवर बोलण्याऐवजी खोटे पण रेटून बोलत जनता व शेतकऱ्यांची दिशाभूल व फसवणूक करीत असल्याचा सणसणीत टोला आमदार बबनराव शिंदे यांनी लगावला आहे.

ते दारफळ सीना ता.माढा येथे माढा विधानसभेचे अपक्ष उमेदवार रणजीत बबनराव शिंदे यांच्या प्रचारार्थ शनिवारी 16 नोव्हेंबर रोजी झालेल्या जाहीर प्रचार सभेत बोलत होते.

यावेळी शिवसेनेचे प्रा. शिवाजी सावंत म्हणाले की,विरोधी उमेदवाराला पंढरपूर भागातील 42 गावांमध्ये कसलाही प्रतिसाद व थारा नाही.माढा तालुक्यातील दोन बलाढ्य शक्ति आमदार बबनराव शिंदे गट व सावंत गट एकत्र आल्याने रणजीत शिंदे यांचा विजय नक्की आहे.ही कटूसत्य लक्षात आल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे त्यामुळे ते बिनबुडाचे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे. ज्या लोकांना आम्ही दोघे एकत्र आलेले पाहवत नाही त्यांच्यावर निवडणुकीनंतर पश्चाताप करण्याची वेळ येणार आहे. मतदारसंघात कसलाही विकास न करता दोन महिन्यात केवळ डिजिटलबाजी व मनोरंजनात्मक कार्यक्रम राबवून आमदार होता येत नसते हे 23 नोव्हेंबर रोजी निवडणूक निकालादिवशी स्पष्ट होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी समाजकल्याणचे माजी सभापती शिवाजी कांबळे यांनी सांगितले की, जिल्ह्याचे नेते समजणाऱ्यांना करकंब व आलेगाव येथील साखर कारखाने नीट चालविता आले नाहीत त्यामुळे ते विकण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढावली. विशेष बाब म्हणजे त्या दोन्ही ठिकाणचे साखर कारखाने अनुक्रमे आमदार बबनराव शिंदे व प्रा. शिवाजीराव सावंत यांनी विकत घेऊन ते सध्या व्यवस्थितपणे चालवले जात आहेत.माळशिरस तालुक्यातील कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या ऊसाला जिल्ह्यात कधीच सर्वोच्च दर दिला नाही. वर्षानुवर्षे राज्यात सत्तेत व मंत्रीपदावर असून त्यांना तालुक्यात साधी एक एमआयडीसी सुरू करता आली नाही हे वास्तव आहे.त्यांनी मागील वर्षी आपल्या दोन्ही कारखान्यातून अंतिम दर किती दिला ते सांगावे.चालू वर्षीच्या गळीत हंगामात ते पहिला हप्ता व अंतिम दर किती देणार आहेत हे जाहीर करुनच जिल्ह्यातील मतदारांना मते मागावीत असे खुले आव्हान त्यांनी दिले आहे.

यावेळी दूध संघाचे संचालक शंभुराजे मोरे, मार्केट कमिटीचे उपसभापती सुहास पाटील, माढेश्वरी बँकेचे व्हा.चेअरमन अशोक लुणावत, झुंजार भांगे, गणेश काशीद, हनुमंत पाडूळे, सज्जनराव जाधव, शिवसेनेचे मुन्ना साठे, नगरसेवक राजू गोटे, अरविंद खरात, सरपंच अशोक शिंदे, शिवाजी बारबोले, औदुंबर उबाळे, कुमार शिंदे, आनंद उबाळे, शहानवाज सय्यद, शिवाजी उबाळे, सुरेश शिंदे, रमेश चव्हाण, रमाकांत कुलकर्णी, विठ्ठल मुकणे, श्रीकांत कोरे, शिवाजी भोगे, सुभाष शिंदे, चंद्रकांत मुळे, भारत भांगे, स्वप्नील खरात, बालाजी बारबोले, विजय शिंदे, नाना बागल, राजेंद्र उबाळे, कुमार नवले, सर्जेराव सुळे, अशोक करळे, राजाभाऊ चव्हाण, उदय कदम, पिंटू नागटिळक, धर्मराज मुकणे, अजिंक्य काटे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमनाथ वैद्य यांनी घेतली सोलापूर बार असोसिएशनच्या वकिलाची भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघांचे अपक्ष उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी आज सोलापूर बार असोसिएशनला भेट दिली वकिलासमोर विकासाचा अजेंडा मांडला. मला आपणासह सोलापूरच्या दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा हवा असून मी या भागाचा आमदार झाल्यास सर्व समाज घटकासाठी काम करीन तसेच मी स्वतः उच्चशिक्षित असून केसी विधी महाविद्यालय चर्चगेट मुंबई येथून विधी पदवी घेतली आहे. पदवीनंतर बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवा साठी त्यांनी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम केल्याचा अनुभवही सांगितला आहे.

19 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तीला आपण आमदार म्हणून नियुक्ती करावे तसेच आमदारकी पदी नव्या प्रशासकीय काम करणाऱ्या चेहऱ्याला काम करण्याची संधी अशी विनंती वैद्य यांनी सर्व वकिलासमोर मांडली आहे. यावेळी सोलापूर बार असोसिएशन अध्यक्ष अमित आळगे, सचिव मनोज पामुल सदस्य विनायकुमार कटारे तसेच ॲड धुरगुडे तसेच जेष्ठ वकिल मंडळी मोठया संख्येने उपस्तिथ होती.

# देवेंद्र कोठे यांच्या प्रचारार्थ मोनिका कोठे यांच्यासह किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांची प्रभाग २२ मधून पदयात्रा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर मध्य विधानसभा निवडणुकीतील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (ए) महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या प्रचारार्थ मोनिका कोठे यांच्यासह माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांची प्रभाग २२ मधून पदयात्रा निघाली.

रामवाडी, सेटलमेंट, पटवर्धन चाळ, लिमयेवाडी परिसरातून होम टू होम प्रचार अभियान राबविण्यात आले. यावेळी चंद्रकांत गायकवाड, आकाश पडवळकर, सूर्यकांत गायकवाड, चेतन गायकवाड, शिरीष गायकवाड, रुक्मिणी जाधव, शोभा गायकवाड, सुनीता बिराजदार, भरता आसवदे, दीपक गायकवाड, श्रीनिवास गायकवाड, सुरेश भंडारे, विनीत गायकवाड, रोहन जाधव, कुमार कांती, नवनाथ साळुंखे, बाबुराव संगेपांग, अजित मित्रगोत्री, सत्यम जाधव, जयश्री गायकवाड, सरोजिनी गायकवाड व मीना गायकवाड उपस्थित होते.

# नई जिंदगी आणि घोडा तांडा येथे संतोष पवार यांना बंजारा आणि मुस्लिम समाजाचा भरघोस पाठिंबाः



**नई जिंदगी (कटूसत्य वृत्त):-** वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचारार्थ नई जिंदगी आणि घोडा तांडा येथे आयोजित जनसन्मान सभेला बंजारा आणि मुस्लिम समाजाचा मोठा प्रतिसाद मिळाला. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. पवार यांनी या सभेत तालुक्याच्या विकासाच्या अपुऱ्या स्थितीवर गंभीर चिंता व्यक्त केली आणि प्रस्थापित राजकीय व्यवस्थेवर कठोर टीका केली.

**सत्ता, पदं, पण विकासाचा अभाव**

"सोलापूर जिल्ह्याने एकेकाळी राज्याच्या मुख्यमंत्री पदावर नेते दिले, मोठमोठी मातब्बर मंडळी तालुक्यातून निवडून गेली. बारामतीने जितकी पदं भूषवली, तितकीच सोलापूरनेही मिळवली, मात्र याचा फायदा तालुक्याच्या सर्वसामान्य जनतेला कधीच झाला नाही. विकासाच्या संधी बाजूला सारून फक्त घराणेशाही आणि राजकीय स्वार्थाची पोषणं झाली," असे संतोष पवार यांनी सांगितले.

**MIDC रद्द आणि सिंचन क्षेत्राचे प्रश्न**

पवार यांनी स्पष्ट केले की, तालुक्यात मंजूर झालेला टकळ्ळ प्रकल्प राजकीय डावपेचांसाठी रद्द करण्यात आला. यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी गमवाव्या लागल्या. "सिंचन क्षेत्र आजही तुटपुंजं आहे. नवनवीन प्रकल्पांची कामं प्रलंबित आहेत. निधी आला तरी तो योग्य ठिकाणी वापरण्यात अयशस्वी ठरलं जात आहे," असे पवार म्हणाले.

**जातीयवाद थांबवून विकासाच्या दिशेने वाटचाल हवी**

"तालुक्यात जाती-धर्मावर आधारित राजकारण सर्रास सुरू आहे. यामुळे सामान्य माणसाच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे. आता हे राजकारण थांबवून विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा आणि काम होण्याची गरज आहे," असे ठामपणे पवार यांनी मांडले.

**हद्दवाढ भागातील विकासही थांबलेला**

संतोष पवार यांनी नगरसेवक, आमदार आणि त्यांच्या विकासाच्या गप्पांवरही प्रकाश टाकला. "हद्दवाढ भागातील परिस्थिती पाहिली तर कोट्यवधींचा निधी आल्याच्या गप्पा केल्या जातात. मात्र प्रत्यक्षात विकास काहीच झालेला नाही. लोकांच्या मूलभूत गरजाही पूर्ण झालेल्या नाहीत," असे ते म्हणाले.

**परिवर्तनाशिवाय पर्याय नाही**

"दर पाच वर्षांनी तीच प्रस्थापित घराणी, तेच पारंपरिक चेहरे विकासाच्या गाजरं दाखवतात. मात्र त्यांचं काम फक्त सत्ता उपभोगण्यापुरतं मर्यादित राहतं. आज तालुक्याचं हे चित्र बदलायचं असेल तर परिवर्तन हाच एकमेव उपाय आहे. परिवर्तनासाठी वंचित बहुजन आघाडीला संधी द्या," असे भावनिक आवाहन संतोष पवार यांनी केलं.

**ग्रामस्थांचा पाठिंबा आणि परिवर्तनाचा निर्धार**

सभेला बंजारा आणि मुस्लिम समाजाच्या लोकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. त्यांच्या पाठिंब्यामुळे वंचित बहुजन आघाडीचा आत्मविश्वास अधिकच वाढला आहे. 'आमच्या समाजाचा विकास साधण्यासाठी संतोष पवार यांच्यासारख्या नेतृत्वाला पाठिंबा देणं आवश्यक आहे,' असे स्थानिकांनी व्यक्त केले.

**पदाधिकाऱ्यांची ठाम भूमिका**

सभेत वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि मार्ग फाऊंडेशनचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनीही समाजाच्या प्रगतीसाठी आणि तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी संतोष पवार यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

**सोलापूर दक्षिणमध्ये परिवर्तनाची चाहूल**

नई जिंदगी आणि घोडा तांडा येथे पार पडलेल्या या सभेमुळे संतोष पवार यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर दक्षिण मतदारसंघात परिवर्तनाची हवा निर्माण झाली आहे. येणाऱ्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी विजय मिळवून विकासाचा नवा अध्याय सुरू करेल, असा विश्वास लोकांमध्ये दिसून येत आहे.

# माढा मतदारसंघातील बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असणारे प्रश्न सोडवण्यासाठी मीनल साठे यांना निवडून द्या -दादासाहेब साठे



**माढा (कटूसत्य वृत्त):-** यंदाची निवडणूक आता पाणी किंवा उसावर नसून ही निवडणूक खऱ्या अथार्ने आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्याची आहे. आपल्या देशात भाजप व राज्यात युतीचे सरकारने गेल्या अडीच वर्षात अनेक शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार, महिला यांच्यासाठी कल्याणकारी योजना शासनाने आणलेल्या आहेत. ॲड. मीनल साठे यांच्या रूपाने महायुतीने एक उच्चशिक्षित, कायदेतज्ज्ञ असणारा उमेदवार दिलेला आहे. त्यांना विजयी करून महायुती सरकारच्या कारभारास प्रतिसाद द्यावा, असे आवाहन जलतज्ज्ञ अनिल पाटील यांनी अंजनगाव उमाटे येथील सभेत बोलताना केले.

माढा विधानसभा मतदार - संघातील महायुतीच्या उमेदवार ॲड. मीनल साठे यांच्या प्रचारार्थ अंजनगाव उमाटे येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी भाजपचे नेते जलतज्ज्ञ अनिल पाटील हे होते. ते पुढे म्हणाले, तालुक्यातील आमदारांनी गेल्या ३० वर्षापासून सर्वसामान्य जनतेची मोठी फसवणूक केलेली आहे. गेल्या ३० वर्षापासून सीना माढा बोगद्यातून नदीला पाणी सोडले. या एकमेव कामावरून ही नेते मंडळी मतदान घेत आहेत. खरंतर या सीना माढा बोगद्याचे काम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने युती सरकारच्या काळात झाले असून त्याचे श्रेय गेल्या पंचवीस वर्षापासून बबनराव शिंदे हे घेत आहेत. आपण समोरचे उमेदवार पाहिले तर एक उमेदवार तर दहावी शिक्षण असलेला व दुसरा उमेदवार त्यांच्या संस्थेत बी. ए. पास झालेला आहे. तर मीनल साठे या उच्चशिक्षित व कायद्याचे शिक्षण घेतलेल्या आहेत. सहकारमहर्षी गणपतराव साठे, माढा तालुक्याचे माजी आमदार धनाजीराव साठे यांचा राजकीय, सामाजिक वारसा लाभलेले नेतृत्व असून त्यांनी माढा नगरपंचायतच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण विकास केलेला आहे.

दादासाहेब साठे म्हणाले, माढा मतदारसंघातील बऱ्याच वषार्पासून प्रलंबित असणारे प्रश्न सोडवण्यासाठी व मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मीनल साठे यांना निवडून द्यावे. महायुती सरकारच्या कल्याणकारी योजना सुरू ठेवण्यासाठी व महायुती सरकारचे हात भक्कम करण्यासाठी आम्ही मीनलताईच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहण्याचे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष मदन मुंगळे यांनी केले.

या सभेसाठी संत कूर्मदास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुधीर पाटील, कारखान्याचे संचालक राहुल पाटील, कारखान्याचे संचालक मधुकर चव्हाण, अंजनगाव उमाटेचे माजी उपसरपंच शिराज शेख, आढेगावचे उपसरपंच भाऊ वाघ, अंजनगाव चे विकास गोरे बिभीषण थोरे उपस्थित होते.

# मतदानासाठी लऊळ येथे स्वीप मल्टीमीडिया व्हॅनची जनजागृती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विधानसभा निवडणूकीमध्ये लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे याबाबत जनजागृतीसाठी केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या स्वीप मल्टीमीडिया व्हॅनचे माढा तालुक्यातील लऊळ येथे उत्साहात करण्यात आले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवणे आणि नव मतदारांना मतदान करण्याकरिता प्रेरित करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या स्वीप मल्टीमीडिया व्हॅनच्या माध्यमातून जिल्ह्यात जनजागृती सुरू आहे.सदर व्हॅनचे माढा तालुक्यातील लऊळ येथे उत्स्फुर्तपणे स्वागत करण्यात आले.यावेळी बी.एल.ओ.शैलेश घुगे, माडेकर, कारंडे, बाजीराव ढोरे, सोमनाथ भोंग, प्रभारी केंद्रप्रमुख सूर्यकांत लोकरे, अंगणवाडी सेविका काजल कांबळे अंगणवाडी सेविका छाया लोंढे, श्रीमती मांदे मदतनीस उषा चव्हाण, श्रीमती डोरे , आशा वर्कर श्रीमती कोकाटे आशा सेविका मुजावर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी व ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थ हजर होते.

# मुंबई शहर जिल्ह्यातील मतदान केंद्रांची जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त निवडणूक अधिकारी संजय यादव यांच्याकडून पाहणी



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई शहर जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून जिल्ह्यातील वरळी, शिवडी व भायखळा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांना जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी संबंधित विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह भेट देऊन पाहणी केली. जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. यादव यांनी भेटी दरम्यान निरंतर जिल्हा निवडणूक व्यवस्थापन आराखडा, मतदान केंद्र, आरक्षित मतदार केंद्र, जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर किमान सुविधा, मतदान केंद्रातील व्यवस्थापन, वेब कास्टिंग, रूट मॅप, सेक्टर मॅप, क्षेत्र नकाशा, संप्रेषण योजना, मतदान कक्षात मतदार सहाय्यकांच्या नियुक्ती, वाहन व्यवस्था, मतदान चिठ्ठ्या याबाबत सविस्तर आढावा घेऊन माहिती जाणून घेतली.

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून मतदान प्रक्रिया मुक्त, शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सूक्ष्म नियोजन करून पयार्यी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले. श्री. यादव म्हणाले की, मतदान केंद्रावर नियुक्त महिला अधिकारी-कर्मचारी यांच्या राहण्यासाठी सुयोग्य व्यवस्था करावी, दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रनिहाय समन्वय अधिकारी नेमावा, मतदान केंद्रांवर दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी सहाय्यता कक्ष, हिरकणी कक्ष, पिण्याचे पाणी व्यवस्था, दिशादर्शक फलक यांचे काटेकोरपणे नियोजन करण्यात यावे, असे निर्देश श्री. यादव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# औदयोगिक क्षेत्रातील कंपन्यामधील कामगारांनी मतदान करण्यासाठी जनजागृती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर व इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभूर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रातील कंपन्यामध्ये जाऊन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने कंपनीमधील कामगारांनी आपल्या कुटुंबियांसह २० नोव्हेंबर रोजी देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान करावे असे आवाहन करण्यात आले.

टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात जनजागृतीसाठी औदयोगिक क्षेत्रातील कंपनी व्यवस्थापनाने उस्फूर्तपणे प्रतिसाद देऊन सहकार्य केले.यावेळी कामकारांनी मतदान करणेची प्रतिज्ञा घेतली.इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभुर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात कामकागांनी मतदान करण्यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी मुख्य चौकाचौकात बॅनर्स लावणेत आले आहेत.या प्रसंगी एमआयडीसी चे स्वीप कोअर समिती सदस्य, इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभुर्णी चे अध्यक्ष, सचिव व असोसिएशन चे इतर सदस्य या उपक्रमात सहभागी झाले होते.